REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ६
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १६ फेब्रुवारी, १९४४ अंक ७

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

## विविध माहिती

### अमेरिकेंत अन्नसामुग्रीचें वाढतें उत्पादन

गेल्या वर्षी हवापाणी विशेष अनुकूल नसतांहि अमेरिकेंत खाद्य पदार्थांच्या उत्पादनानें उच्चांक गाठला. ओळीनें एकामागून एक सात वर्षांच्या अवधींत अमेरिकेंत पिकें चांगलीं आलीं आहेत. १९३५-३९ च्या सरासरीच्या मानानें १९४३ मध्यें खाद्यपदार्थांचें अमेरिकेंतील उत्पादन ३२ टक्क्यांनीं अधिक होतें.

### मुंबई प्रांतिक बँकेची येवळें येथील उपशाखा

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या येवलें उपशाखेचा उद्घाटन समारंभ ता. ३० जानेवारी १९४४ रोजीं झाला.

### नारिंग पोळी

नारिंगें, मोसंबीं व संत्रीं ह्या जातींच्या फळांवर पॅलेस्टाइनमध्यें प्रयोग चालले आहेत आणि त्यांची फणसपोळीसारखी पोळी बनवतां येऊन त्यांचा मूळचा स्वाद तीमध्यें कायम राहील अशी अपेक्षा आहे.

### पाइनपासून पेट्रोल

पाइन झाडांच्या बुंध्यांपासून पेट्रोल तयार करण्यांत एका चिनी शास्त्रज्ञानें यश मिळवलें आहे. हें पेट्रोल सध्या चीनमध्यें वापरण्यांत येत आहे आणि ह्या युद्धोपयोगी साधनाच्या तुटवड्याचा प्रश्न सोडवण्यास त्या देशास मदत होत आहे.

टेकडीवर
★ ★ ★
दोन विहिरींच्या पाण्याची सोय!
★ ★ ★

# रामबाग कॉलनी


## १८७ पैकीं ११५ प्लॉटस् खपले!

टेकडीखालीं
★ ★ ★
तीस फुटी अकरा रस्ते.
★ ★ ★

प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ५०० ते १०००.

उत्तर

पश्चिम




पूर्व

दक्षिण

पुढील प्लॉटस् विकणें आहेत (टेकडीखालीं) नं. १, २, ३, १३, १४, ५५, ६०, ६१, ७१, ९३, ९४, ९५, ९८, ९९, १००, १०१, १०४, १०९, ११०, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२४. (टेकडीवरील) १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६ १३७, १३८, १३९, १४०, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५७, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १८१, १८२, १८३, १८४, १८५, आणि १८७—एकूण ७२.

खालील पत्त्यावर भेटावें:—
समक्ष भेटण्याची वेळ:—दररोज रात्रीं ८ ते १०
फक्त रविवारीं सकाळीं ९ ते १२.

**म. य. दातार,**
"दयानिवास" नं. ११, कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें नं. २.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ...५० | काम करणाऱ्या स्त्रिया-कोळशाच्या खाणींतील मजुरांसाठीं सुखसोयी-हिंदी धंदेवाल्यांची राष्ट्रीय सरकारविषयीं मागणी | ... |
| २ गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा (२) | ...५१ | ५ युद्धाचा चलन व बाजार भाव ह्यांवरील परिणाम | ...५५ |
| ३ विमेदारांच्या परस्पर हितसंबंधांची प्रमाणबद्धता | ...५२ | ६ वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. | ...५५ |
| ४ स्फुट विचार ... संयुक्त राष्ट्रांच्या अन्नपुरवठा योजनेंत हिंदुस्थानचा भाग—कोळशाच्या खाणींत | ...५३ | | |

*अर्थ*

बुधवार, ता. १६ फेब्रुवारी, १९४४

## गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा

(२)

वरील शीर्षकाखाली ता. १९ जानेवारीच्या "अर्था" मध्यें मुंबई येथील शेअर ब्रोकर्स, मे. आर. आर. नाबर आणि कंपनी ह्यांच्या "Review of the year 1943 and Prospects for 1944" ह्या वार्षिक पुस्तकाचा परामर्श घेतांना आंतरराष्ट्रीय लष्करी परिस्थिती, युद्धखर्च, चलनवाढ व महागाई, सट्टेबाजीस आळा घालण्याचा प्रयत्न इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून आम्हीं उद्योगधंद्यांची पार्श्वभूमी स्पष्ट केली. आतां सरकारी रोखे, प्रेफरन्स भाग व बँका आणि विमा कंपन्यांचे भाग ह्यांसंबंधीं विवेचन येथें करावयाचें आहे. सरकारी रोख्यांस सतत मागणी राहिल्याकारणानें त्यांचे भाव चढीचे राहिले व रिझर्व्ह बँक चार नवीं कर्जें यशस्वी रीतीनें विकूं शकली. युद्धाच्या शेवटासंबंधाच्या अपेक्षांत अनुकूल सुधारणा, कर्जविषयक धोरणांतील चातुर्य, इत्यादि कारणांमुळें हा फरक घडून आला. हिंदुस्थान सरकारच्या प्रत्येक नव्या कर्जाच्या अटी सरकारास अधिकाधिक अनुकूल व कर्ज देणारास प्रतिकूल होऊं लागल्या व जुन्या कर्जाच्या किंमती वाढूं लागल्या. सरकारनें रोख्यांच्या किमान किंमती २ मार्च, १९४३ रोजीं प्रथम ठरविल्या, त्यांत २ सप्टेंबर रोजीं व ११ डिसेंबर रोजीं पुनः वाढ करण्यांत आली. अर्थात्, रोख्यांच्या बाजारांतील प्रत्यक्ष किंमती किमान किंमतीपेक्षा ज्यास्तच होत्या. २३ डिसेंबर, १९४२ ते २३ डिसेंबर, १९४३, ह्या बारा महिन्यांतील रोख्यांच्या किंमतीमधील तुलनात्मक वाढ खालील तक्त्यांत दर्शविली आहे:—

रोख्यांचे बाजारभाव

| | २३-१२-१९४२ | २३-१२-१९४३ |
|---|---|---|
| | रु. आ. | रु. आ. |
| ३½% सरकारी रोखे | ९३-१० | ९७-१० |
| ३% १९६३-६५ | ९३-१० | ९८-८ |
| ४% म्हैसूर १९५३-६३ | ११७-० | १२४-० |
| ३% सी. पी. लोन, १९५५ | ९७-१२ | ९९-६ |
| ४% मुंबई पोर्टट्रस्ट (दीर्घ मुदत) | १०८-० | ११३-० |

रोखे धारण करणारांना त्यांच्या रकमांवर ३·६८% निव्वळ व्याज सुटतें. युद्धाच्या प्रारंभीं ३·२७% व्याज सुटत होतें. म्हणजे, ०·५९% व्याज कमी सुटूनहि सरकारी रोख्यांची किंमत वाढत आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. जोंपर्यंत व्याजाचे दर स्वस्त राखण्याचें सरकारी धोरण कायम आहे, तोंपर्यंत सरकारी रोखे खालीं उतरणें संभाव्य नाहीं.

प्राप्तीवरील करमाफ प्रेफरन्स भागांना गेल्या वर्षी विशेष मागणी होती. त्याचप्रमाणें, ज्या प्रेफरन्स भागांना ह्यापूर्वी डिव्हिडंड मिळालें नाहीं त्यांचें बाकी राहिलेलें डिव्हिडंड मिळण्याची अपेक्षा व कांहीं प्रेफरन्स भागांना ऑर्डिनरी व इतर प्रेफरन्स भागांचें डिव्हिडंड देऊन झाल्यावर पुनः नफावाटणीचा हिस्सा मिळण्याची आशा, अशा विविध कारणांमुळें प्रेफरन्स भाग कायम तेजींत राहिले. ह्या संबंधांत खालील तक्ता उद्बोधक आहे:—

प्रेफरन्स भागांचे बाजारभाव

| | वसूल भांडवल | २३-१२-४२ | २३-१२-४३ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| न्यू व्हिक्टोरिया | ५ | १०-१२ | १५-२ |
| ५% स्टील कॉर्पो * | १०० | ११२-० | १२०-० |
| ५% सें. इंडिया * | ५०० | ६८२-८ | ७३१-४ |
| ७½% टाटा स्टील क्यु. प्रे. | १०० | १२५-० | १५४-८ |
| ६¾% प्री. कन्स्ट्रक्शन | १०० | १२३-० | १३६-८ |
| ३% ब्रॅडबरी मिल्स | २५० | २८२-८ | ५५५-० |
| ५¼% टाटा मिल्स | २५ | ३७-० | १४१-८ |

(*) कर माफ)

१९४२ हें वर्ष बँकांना फारच चांगलें गेलें व बहुतेक सर्व बँकांच्या नफ्यानें उच्चांक गांठला. रिझर्व्ह बँकेस ३० जून, १९४३ असेरच्या वर्षी ७ कोटि, ७० लक्ष रुपये नफा झाला. ३० जून, १९४४ असेरच्या नफ्याचा आकडा ह्यापेक्षाहि वाढणार हें उघड आहे. युनायटेड कमर्शिअल बँक, भारत बँक, जयपूर बँक, हिंदुस्थान कमर्शिअल बँक, ह्या बँका गेल्या वर्षी नव्यानेंच स्थापन झाल्या व त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें ४ कोटि रुपये, १० कोटि रुपये, २ कोटि रुपये, व ५ कोटि रुपये आहे. सर्वच बँकांचे भाग तेजींत राहिले व नव्या बँकांचें पहिलें वर्ष पुरें होण्याचे अगोदरच त्यांच्या भागांची किंमत वसूल भांडवलाच्या जवळ जवळ दिढीपर्यंत चढली!

बँकांच्या भागांचे बाजारभाव

| | वसूल भांडवल | २३-१२-४२ | २३-१२-४३ |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह बँक | रु. | रु. | रु. |
| | १०० | १००-८ | १३१-० |
| इंपीरिअल | ५०० | १६५०-० | १९७०-० |
| बँक ऑफ इंडिया | ५० | १५५-० | २२३-८ |
| बँक ऑफ बरोडा | ५० | १२९-० | १४६-० |
| सेंट्रल बँक | २५ | ५६-८ | ८७-८ |
| पंजाब नॅशनल | १०० | २२०-० | ३७५-० |

विमा कंपन्यांचे भाग

बँकांप्रमाणें विमा कंपन्यांसहि १९४२ हें वर्ष चांगलें गेलें व आयुष्याच्या विम्याप्रमाणें इतर विम्यांचेहि कामांत वाढ झाली.

भरमसाठ बोनस देण्याचे धाडस विमाखातें आज्या धाटीत आहे व कंपन्या आपल्या हप्त्यांचे दरहि बदललेल्या परिस्थितीस अनुसरून सुधारून घेत आहेत. ज्या कंपन्यांचे खर्च बेसुमार होते किंवा ज्यांना प्रमाणाबाहेर नुकसान आलें, अशा कंपन्यांवर आपले व्यवहार सुधारण्यास सक्ती झाली व ज्या कंपन्यांची स्थिति मर्यादेपलीकडे बिघडली, अशांना काम बंद करावें लागलें. चांगल्या कंपन्यांचे मात्र १९४२ सालीं तेजींत राहिले; ती तेजी मात्र प्रमाणाबाहेर होती, असें म्हणावें लागतें. खालील तक्त्यांत प्रमुख कंपन्यांच्या भागांच्यां किंमतीमधील वाढ दाखविली आहे:—

| | १-९-३९ | २२-१२-४२ | २१-१२-४३ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| ओरिएंटल | ४,३०० | ४४१० | ६१६० |
| न्यू इंडिया | ३५-१२ | ५६–४ | ८८–० |
| व्हल्कन | ७–१ | ११-१२ | १७–८ |
| ज्युपिटर | १२-१० | १६-१० | ३०–४ |

## विमेदारांच्या परस्पर हितसंबंधांची प्रमाणबद्धता

### नफ्यासह व नफ्याविरहित विमा

व्याजाचे दर उतरत चालले आहेत, त्याचा परिणाम विमाकंपन्यांच्या उत्पन्नावर झाला आहे. आयुर्विम्याचे हप्ते ठरवितांना ज्या गोष्टी ध्यानांत घ्यावयाच्या असतात, त्यांपैकी कंपनीस मिळावयाच्या व्याजाचा अपेक्षित दर, ही एक बाब असते. व्याजाचे दर उतरत चालले, तर त्या प्रमाणांत साहजिकच कंपन्यांचें उत्पन्न घटतें. ग्रेटब्रिटनमधील विमा कंपन्या आपले पैसे खुषीनें मोठ्या प्रमाणांत सरकारी रोख्यांत गुंतवीत आहेत व हिंदुस्थानांतील कंपन्यांना कांहीं ठराविक प्रमाणांत सरकारी रोख्यांचा अवलंब करणें भाग पडत आहे. परंतु दोन्हीं ठिकाणीं कंपन्यांचें व्याजाचें उत्पन्न कमी झालें आहे. हिंदी कंपन्यांचें मूल्यमापन आतां ३½% दरानें करण्याची पाळी आली आहे. हिंदी कंपन्यांचें मूल्यमापन गेलीं कित्येक वर्षे ५%, ४½% अशा दरानें करण्यांत आलेलें आहे. ह्यावरून आतां परिस्थितींत किती पालट झालेला आहे, हें लक्षांत येईल. ह्याचा परिणाम मूल्यमापनांत कमी वाढावा उरण्यांत अथवा तूट येण्यांत होईल व विमा कंपन्यांना आपले खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्यासाठीं हप्त्यांचीं कोष्टकेंहि सुधारून घ्यावीं लागतील.

(१) ज्या विम्यांना नफ्यांत भागी नसते व (२) ज्या विम्यांना नफ्यांत भागी मिळते अशा दोन प्रकारचे आयुर्विमे असतात. पहिल्या प्रकारांत, विमा मंडळीला होणारा नफा विमेदारांना मिळत नाहीं; परंतु नफ्यासह विम्यांना बोनस मिळतो. नफ्यासह योजनेंत नफ्याशिवाय योजनेपेक्षां जास्त हप्ता भरावा लागतो, हें उघड आहे. अर्थात्, ज्यास्त घेतला जाणारा हप्ता तेवढाच नफा म्हणून विमेदारांस परत मिळतो, असें नाहीं. विम्याचा धंदा कंपनीनें फायदेशीर केला, तर नफ्याशिवाय विम्याचे योजनेस त्या नफ्याची वांटणी मिळत नाहीं; परंतु वाटणी मिळण्यासाठीं ज्यास्त हप्ता देणारांना मात्र वाटणींत भागी मिळूं शकते. चांगल्या कंपन्यांच्या बोनसचा दर पुष्कळ मोठा असतो व नफ्यासह योजनेंतील विमेदारांना जादा हप्ता देणें किफायतशीरच ठरतें. ह्या बोनसच्या अपेक्षेनें लोक नफ्यासह विम्याचाच अवलंब करतात. असें दिसून येतें.

आतां काय परिस्थिति झाली आहे ! विमा कंपन्यांना पूर्वीप्रमाणें नफा होणें अशक्यप्राय झालें आहे व त्यांचे बोनसचे दर उतरले आहेत. कांहीं कंपन्यांचा बोनस बंदहि झाला आहे. आपणांस बोनस मिळेल, ह्या अपेक्षेनें जादा हप्ता भरणारे विमेदार नफ्याविरहित योजनेंतील विमेदारांचे बरोबरीनेंच येऊन बसले आहेत, ह्यामुळें विमेदारांत, एकमेकांचे हितसंबंध लक्षांत घेतां, विषमता उत्पन्न झालेली आहे. नफ्याविरहित योजनेंतील विमेदारांनाहि नफ्यासहित विमेवाल्यांप्रमाणेंच, सद्यःस्थितिजन्य परिणाम कां भोगावा लागूं नये, असा प्रश्न उपस्थित होतो. बोनसच्या अपेक्षेनें ज्यांनीं जादा हप्त्यांचा बोजा स्वीकारला, त्यांनींच सध्याच्या परिस्थितीचा परिणाम प्रथम भोगला पाहिजे, ह्या म्हणण्यांत तथ्य नाहीं, असें नाहीं. तथापि, विमाकंपन्यांच्या अधिकाराबाहेरील परिस्थितीचा विमेदारांपैकी एका विवक्षित वर्गावरच विशेष प्रतिकूल परिणाम होत आहे, हें मात्र निश्चित. ही परिस्थिति अपेक्षित नव्हती, म्हणून तिच्या दुष्परिणामांचा सबंद बोजा त्यांचेवरच बसूं नये, हें म्हणणें विमापत्रकांतील करारास अर्थातच धरून नाहीं.

विमेदारांना योग्य बोनस मिळूं लागणें, हाच ह्या घटनेवर सर्वांत चांगला उपाय आहे. त्यासाठीं हप्ते वाढविले पाहिजेत. विम्याचे हप्ते वाढवितांना, नफा वाटणीस पात्र नसलेल्या विम्यांचे हप्ते सध्या मुळींच परवडत नाहींत म्हणून त्यांत वाढ करावयाची व नफ्यासह विम्याचे हप्ते त्या मानानें वाढवावयाचे नाहींत, असें धोरण ठेवणें चुकीचें होईल. दोन्ही प्रकारच्या विम्यांचे हप्त्यांत, विमेदारांना मिळावयाच्या रकमांचे प्रमाणांतच वाढ झाली पाहिजे, हें उघड आहे. त्याचप्रमाणें एकाच गटांतील वेगवेगळ्या विम्यांच्या अटीहि सर्व विम्यांचे दृष्टीनें योग्यायोग्य विचार करूनच ठरविल्या पाहिजेत. बोनसच्या वाटणीच्या नियमांतहि कांहीं सुधारणा करणें शक्य होईल. नफ्यासह व नफ्याविरहित विम्यांचे स्वतंत्र हिशेब राखणेंहि अशक्य होणार नाहीं, व ते तसे ठेवले तर नुकसानीचा बोजा दोन्हीं प्रकारच्या विम्यांवर योग्य प्रमाणांत टाकतां येणें शक्य होईल. विमेदारांनीं भरलेल्या हप्त्यांचे व अपेक्षेचे प्रमाणांत नफा नुकसानीची वाटणी आज होत नाहीं व ती काटेकोरपणानें होणें कठीण आहे. तथापि, ह्यासंबंधांतील एक महत्त्वाचा मुद्दा ह्या दृष्टीनें वरील विवेचन विमेदारांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे. विमा कंपन्यांनीं हप्ते बदलण्यास उशीर लावला तरी कोणत्या प्रकारचा विमा आपणांस सध्याच्या परिस्थितींत फायदेशीर आहे, हें विमेदारांस कळणें अगत्याचें आहे. अर्थात व्याजाचें उत्पन्न, मृत्यूंचें प्रमाण, इत्यादि संबंधांतील स्थिति बदलली तर आजचा निर्णय हाच योग्य निर्णय ठरेल, असें मात्र नाहीं. विम्याचा करार दीर्घ मुदतीचा असतो, ह्या दृष्टीनेंच त्याचा विचार केला पाहिजे. अल्पकालीन गोष्टींचा विम्याचे धंद्यावर दीर्घकालीन अनुकूल वा प्रतिकूल परिणाम जसा होत नाहीं त्याचप्रमाणें धंद्याची परिस्थिति सुधारण्यासहि थोडा काळ पुरा पडत नाहीं, हें ध्यानांत घेऊनच विमा कंपन्यांनीं आपल्या व्यवहाराची पुनर्रचना केली पाहिजे व विमेदारांनीं आपल्या विमा पॉलिसींची निवड केली पाहिजे.

### हिंदुस्थानांतील मायका

मायका ह्या खनिज धातूचा सबंद जगांत जेवढा पुरवठा होतो, त्यांपैकी ८० टक्के हिंदुस्थानांतील मायकाचा असतो.

## स्फुट विचार

### संयुक्त राष्ट्रांच्या अन्नपुरवठा-योजनेंत हिंदुस्थानचा भाग

शत्रूच्या तावडींतून मुक्त केलेल्या देशांस युद्ध संपतांच अन्न, कापड इत्यादि जीवनास जरूर असलेल्या जिनसांचा पुरवठा करावा लागेल, त्यासाठी चवेचाळीस संयुक्त राष्ट्रांनीं जी व्यवस्था उभारली आहे तीमध्यें हिंदुस्थान सरकार भाग घेत आहे. शत्रूनें उध्वस्त केलेल्या देशांसच ही मदत मर्यादित न होतां त्याच्याशी होणाऱ्या लढायांच्या दृष्टीनें महत्वाचे असलेले हिंदुस्थानांतील बंगाल, आसामसारखे प्रांतहि त्या योजनेंत यावे अशा आशयाची सूचना अमेरिकन काँग्रेसमध्यें केली गेली आहे आणि ती चवेचाळीस राष्ट्रांच्या संघटनेस मान्य होईल अशी अपेक्षा आहे. आतां हिंदुस्थानपुढें प्रश्न आहे तो प्रस्तुत संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमास लागणाऱ्या खर्चापैकीं किती भाग हिंदी सरकारनें सोसावा ह्याविषयीं आहे. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या येत्या अधिवेशनांत ह्या खर्चास सरकारला मान्यता मिळवावी लागेल. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेपासून हिंदुस्थाननें फटकून रहाणें अनिष्ट व अशक्य आहे ह्यांत वाद नाहीं. ह्या देशास तिच्या अंमलबजावणीचा किती खर्च झेपेल आणि त्यानें किती वर्गणी व सहाय द्यावें हाच येथें महत्त्वाचा मुद्दा आहे.त्याचा निर्णय करतांना हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति व सांपत्तिक शक्ती हीं लक्षांत घ्यावीं लागतील. खर्चाच्या दोन बाबी आहेत. चालू व्यवस्थेस लागणारा खर्च आणि आपद्ग्रस्त देशांस द्यावयाची मदत. ह्यांतला किती अंश हिंदुस्थानच्या वाट्यास यावा हेंच ठरवणें महत्वाचें काम आहे. मूळ कल्पनेप्रमाणें १९४४ सालचा चालू खर्च एक कोटि डॉलर्स होईल त्यापैकीं ४० टक्के अमेरिका सोशील आणि इंग्लंड व रशिया ह्यांच्या वाट्यास प्रत्येकी १५ टक्के येतील. चीनचा वाटा ५ टक्के व हिंदुस्थानचा ४ टक्के आहे. दुसऱ्या प्रकारच्या खर्चास द्यावयाच्या वर्गणीबाबत असें ठरलें आहे कीं जून, १९४३ अखेरच्या वर्षांतलें प्रत्येक सभासद राष्ट्राचें जें उत्पन्न असेल त्याचा १ टका त्यानें द्यावा. हिंदुस्थानसारख्या देशाच्या दृष्टीनें हा वर्गणीचा बोजा असह्य आहे. कारण ही रक्कम २०–२५ कोटि रुपये होईल. म्हणून प्रत्येक देशाची परिस्थिति लक्षांत घेतली जाऊन हा आकडा ठरवण्यांत येईल अशी व्यवस्था मूळ घटनेंत आहे आणि हिंदुस्थानास हा अपवाद लागू करावा लागेल. शिवाय, स्वतः हिंदुस्थान मदतीस पात्र व्हावयाचा आहे तेव्हां एका हातानें त्यास सहाय घ्यावयाचें आणि दुसऱ्या हातानें मदतीचा हिस्सा त्याचेकडून घ्यावयाचा हें शक्य व उचित होणार नाहीं. अमेरिकन काँग्रेसपुढें आलेली सूचना सर्वमान्य झाल्यास हिंदुस्थाननें द्यावयाच्या आणि घ्यावयाच्या सहायाची वजावाट होऊन ह्या देशास मिळणें योग्य असलेल्या मदतीची बरीच मोठी बाकी शिल्लक उरेल.

---

### कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या स्त्रिया

कोळशाच्या खाणींत स्त्रियांनीं काम करणें अपायकारक आणि अनिष्ट असल्यानें त्यांना अशा प्रकारचें काम करण्यास लावण्यास कायद्यानें हिंदुस्थानांत बंदी केलेली होती, ती विशिष्ट युद्धपरिस्थितींत काढून घेण्यांत आली आहे. दगडी कोळशाचा तुटवडा त्याची निर्गत होते म्हणून भासत आहे असें मानणें वस्तुस्थितीस सोडून आहे आणि त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचीं कारणें निराळीं आहेत असा खुलासा सरकारच्या वतीनें करण्यांत आला आहे. खाणींत काम करण्याची स्त्रियांस परवानगी देण्यांत आली आहे ती सध्याच्या विशिष्ट परिस्थितीच्या मुदतीपुरतीच आहे आणि आपल्या स्त्रिया स्वतःच्या बरोबर काम करण्यास असाव्या असा पुरुष कामकऱ्यांचा आग्रह असल्यानें व त्यांची संख्या घटूं नये, ह्या उद्देशानें प्रस्तुत नवी व्यवस्था अमलांत आणली गेली आहे असेंहि त्यांत म्हटलें आहे. खाणींत काम करणाऱ्या लोकांस उत्तेजन मिळावें म्हणून त्यांच्या गैरसोई दूर केल्या जात आहेत आणि त्यांस अधिक सवलती देण्यांत येत आहेत. स्त्री कामकऱ्यांसंबंधांतली बंदी सरकारनें उठवली आहे, त्याविषयीं कांहीं बाजूंनीं नापसंती दर्शविण्यांत येत आहे आणि तिचा प्रतिध्वनि ब्रिटिश कॉमन्स सभेंत कामकरी पक्षाच्या प्रतिनिधींनीं हिंदी सेक्रेटरी ऑफ स्टेटला विचारलेल्या प्रश्नांत उठला आहे. ह्यांपैकीं एकास उत्तर देतांना मि. एमेरी ह्यांनीं खालील माहिती सांगितली. कायद्याप्रमाणें कोणाहि कामकऱ्यास एका आठवड्यांत सहा दिवसांपेक्षा किंवा एकूण चोपन्न तासांपेक्षा अधिक वेळ कामास लावतां येत नाहीं. एका दिवसांत खाणीच्या आंत नऊ तास व वरती दहा तास ह्यापेक्षा अधिक काळपर्यंत काम देतां येत नाहीं. १९४२ सालीं खाणीच्या आंत कामकरणारांची दररोजची मजुरी सरासरी १ रु. १० आ. ९ पै ते १० आ. ९ पै त्यांच्या दरम्यान खाणींच्या ऐपतीप्रमाणें होती. अलीकडे मजुरीचे दर वाढवण्यांत आले आहेत आणि ते युद्धापूर्वीच्या काळापेक्षा ५० टक्के अधिक आहेत. १९४२ मध्यें खाणींत २८७ अपघात झाले आणि त्यांत ३४२ माणसें प्राणास मुकून दीड हजारांस जबर व दहा हजारांस किरकोळ दुखापती झाल्या. खाणींत काम करणारांची एकूण संख्या सुमारें साडेतीन लक्ष होती. खाणींत काम करणारांस उत्तेजन मिळावें म्हणून आवश्यक असे उपाय योजले जात असल्याचें आश्वासन स्टेट सेक्रेटरींनीं दिलें.

---

### कोळशाच्या खाणींतील मजुरांसाठीं सुखसोयी

हिंदुस्थानांतील दगडी कोळशाच्या खाणींत काम करण्यास आणखी मजूर हवे आहेत. कोळशाचा सध्या भासत असलेला तुटवडा भरून काढण्यास त्याचें उत्खनन वाढणें आवश्यक आहे. स्त्रियांना खाणींत काम करण्याची कायद्यानें केलेली बंदी ह्यासाठीच उठवण्यांत आली आहे. पुरेसे मजूर खाणींसाठीं मिळण्याकरितां त्यांतलें काम अधिक आकर्षक कां करीत नाहीं असा प्रश्न ब्रिटिश कॉमन्स सभेंत विचारला गेला असतां ह्यासंबंधांत जरूर ती तरतूद करण्यांत येत आहे असें उत्तर देण्यांत आलें होतें. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचा काय उपक्रम आहे ह्याचें दिग्दर्शन नुकतेंच करण्यांत आलें आहे. खाणींतील मजुरांस सुखसोयी पुरवण्यास पैसा लागणार आहे त्याकरितां एक फंड उभारण्याचें सरकारनें ठरवलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोळशाच्या खाणींतून निघालेला कोळसा वहातुकीसाठीं रेल्वेवर येईल तेव्हां त्याच्या प्रत्येक टनामागें एक आणा ते चार आण्यांपर्यंत पट्टी गोळा केली जाईल. खाणींचे मालक व मजूर ह्यांचे प्रतिनिधी असलेली एक सल्लागार समिती नेमण्यांत येईल आणि ह्या पट्टीचा दर तिच्या सल्ल्यानें ठरवला जाईल. हें काम तात्काळ चालू व्हावें ह्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढला आहे आणि त्यास अनुसरून

कोळशावरील पद्धी बसवण्याचा अधिकार स्वतःच घेतला आहे. खाणींतील मजुरांची स्थिति सुधारण्याची सरकारची योजना स्वागतार्ह आहे. तिचा अपेक्षित इष्ट परिणाम मजुरांच्या संख्येवर, रहाणीवर आणि उत्पादकतेवर होऊन स्त्रियांस खाणींत काम करण्याची परवानगी तात्पुरती देण्यांत आली आहे तिची लवकरच आवश्यकता रहाणार नाहीं अशी आशा आहे.

---

### हिंदी धंदेवाल्यांची राष्ट्रीय सरकाराविषयीं मागणी

लोकांच्या विश्वासांतलें आणि त्यांस जबाबदार असें मंत्रिमंडळ हिंदुस्थानच्या मध्यवर्ती सरकारांत स्थापन झाल्यावांचून ह्या देशाच्या आर्थिक उद्धाराचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटावयाचा नाहीं हें मत हिंदी उद्योगधंद्यांतील पुढाऱ्यांकडून स्पष्टपणें व्यक्त केलें जात आहे. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाची कोणतीहि योजना मध्यवर्ती सरकाराच्या विधायक कार्यक्रमानेंच यशस्वी होऊं शकणार आहे. भांडवलवाल्यांनीं त्यांस योग्य वाटतील ते धंदे काढावे किंवा चालवावे अशी बेफिकीरीची वृत्ती सरकारची असून चालणार नाहीं. राष्ट्रीय योजना म्हटली कीं तीमध्यें सरकारचा हात आलाच. शिवाय, युद्धपरिस्थितींत इतकीं सरकारी नियंत्रणें आज अमलांत आहेत कीं तीं एकदम दूर करणें घोटाळा उत्पन्न होण्यास कारणीभूत होतील. युद्धोत्तर आर्थिक घडी बेतावातानें सहेतुक रीतीनें बसवावी लागेल. ह्यासाठीं लोकमतानुवर्ती मध्यवर्ती राज्यव्यवस्थेचें अगत्य आहे. पुनर्घटनाहि सरकार आणि जनता ह्यांच्या सहमतानें व्हावी लागेल आणि ती अशी होईल तरच तिला यश येईल. मुंबईच्या इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना अध्यक्ष, श्री. हरिदास माधवदास ह्यांनीं असें सांगितलें कीं, हिंदी धंदेवाल्यांच्या मतें ह्या देशांत जबाबदार राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यावांचून स्वदेशी उद्योग व व्यापार ह्यांची उन्नति होणें अशक्य आहे. हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्या देशांतील औद्योगिक पुढाऱ्यांचा विचारविनिमय घडवून आणण्याची एक योजना शिजत आहे तिला उद्देशून ते म्हणाले कीं सध्यांचें परस्परांविषयींच्या अविश्वासाचें वातावरण शुद्ध झाल्याविना नुसत्या चर्चेचा कांहीं उपयोग होणार नाहीं. हिंदी व्यापार व धंदे ह्यांतला आपला हिस्सा कमी किंवा नाहींसा होण्याची भीति ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटते आणि ह्या देशांतील मुख्य धंदे हिंदी वर्चस्वाखालीं राहिले पाहिजेत असा येथील औद्योगिक पुढाऱ्यांचा कटाक्ष आहे. हा अभिप्राय वर निर्दिष्ट केलेल्या इंडियन चेंबरच्या सभेंत श्री. प्राणलाल ह्यांनीं व्यक्त केला. हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण स्वच्छ होऊन सरकार लोकसत्ताधिष्ठित केलें जाण्याची आवश्यकता हिंदी धंदेवाले प्रतिपादित आहेत, त्याच्या मुळाशी देशाच्या आर्थिक नियोजनाचीं सूत्रें राष्ट्रीय वृत्तीच्या मध्यवर्ती सत्तेच्या हातीं असण्याचें सर्वांस वाटत असलेलें महत्त्व आहे. व्हायकौंट व्हेवेल ह्यांनीं जें घडाडीचें आणि जनतेचें सहकार्य मिळवण्याचें धोरण स्वीकारलें आहे त्याचेयोगानें ह्या प्रकारची अपेक्षा जागृत झाली आहे.

---

### मद्रास अँब्युलन्स फंड

दुखणाइतांसाठीं उपयोगांत येणाऱ्या मोटारगाड्या सार्वजनिक देणग्यांमधून लष्करांस देण्यासाठीं मद्रास प्रांतांत फंड गोळा करण्यांत येतो, त्याच्या तर्फेनें अशा १०६ गाड्या आतांपर्यंत हिंदी सैन्यास बहाल करण्यांत आल्या आहेत.


## दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

| मुदत | | दर | |
|---|---|---|---|
| ६ | महिने | ४ | टक्के |
| १२ | „ | ४॥ | „ |
| २४ | „ | ५ | „ |

माहिती व अर्जांकरितां मॅनेजर यांस लिहा.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,८०,६५० | रु. ३,४०,३२५ |

एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

## खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब
२० शुक्रवार, पुणें.
(२)

## युद्धाचा चलन व बाजारभाव ह्यांवरील परिणाम

### तुर्कस्तान, इजिप्त, इराक व सायप्रस येथील आर्थिक परिस्थिति.

( दि ऑटोमान बँकेच्या अध्यक्षाचा आढावा )

तुर्कस्तान हा देश तटस्थ असला, तरी युद्धजन्य परिस्थितीचा त्याच्या सबंध आर्थिक संसारावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. हवा प्रतिकूल होती व कित्येक शेतकरी लष्करांत दाखल झाले आहेत. त्यामुळें धान्याचें उत्पादन कमी झालें. आवश्यक मालाचा तुटवडा व चलनवृद्धि ह्यांचा परिणाम बाजारभाव चढण्यांत झाला. घाउक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर १९४१ मध्यें २२२ होता तो १९४२ मध्यें ५२१ झाला. म्हणजे, १९४१ चे मानानें १९४२ सालीं महागाई १३५% वाढली. कांहीं तुर्की मालास. बाहेर चांगली मागणी आल्यामुळें हुंडणावळ सुधारली व सेंट्रल बँकेजवळील सुवर्णसंचय वाढला.

१९४२ मध्यें जर्मन फौजा ॲलेक्झँड्रियाचे समीप येऊन ठेपल्या, त्यावेळीं इजिप्तमध्यें थोडी गडबड उडाली. तथापि, बँका त्यांतून निभावल्या. कपाशीचा धंदा नीट चालू होता. १९४१ चे मानानें १९४२ सालीं सरकारी धोरणानुसार कपाशीची लागवड निम्यावर आणण्यांत आली. त्यामुळें इतर पिकांस सवड मिळून धान्याची आयात कमी करतां आली. मालाची आयात फारच कमी झाली व बाजारभाव वाढले.

उत्तर आफ्रिकेंतून जर्मनीची हकालपट्टी होण्यास प्रारंभ होईपर्यंत इराकमधील राजकीय व आर्थिक परिस्थिति अस्थिर होती. संयुक्त राष्ट्रांचा खर्च व निर्गतीसाठी भारी दरानें धान्य खरेदी ह्या कारणांमुळें इराकमधील प्रचलित चलनी नोटा १·१ कोटि इराकी दिनारांवरून २·२ दिनारांवर गेल्या. स्थानिक द्विदल धान्याच्या किंमतींत युद्धपूर्व किंमतीच्या मानानें ८००%ते १०००% वाढ झाली. सरकारनें रहाणीच्या खर्चाचें वाढतें मान मर्यादित करण्यासाठी एक कमिटी नेमली.

पॅलेस्टाइनमधील परिस्थितींत सुधारणा होत गेली. लष्करी खर्चांत वाढ व मालाचा तुटवडा ह्यामुळें येथेंहि रहाणीचा खर्च वाढला व जमिनी भयंकर महागल्या. प्रचलित चलनी नोटांतहि वाढ झाली. सायप्रसमध्येंहि अशीच परिस्थिती होती.

### वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.

मार्सलंड प्राइस अँड कंपनी लि. चें वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. असें नामांतर करण्यांत येणार आहे. मार्सलंड प्राइस अँन्ड कंपनी १९०८ सालीं नोंदण्यांत आली व काँक्रिटचें आणि पोलादी बांधकाम हें तिचें वैशिष्ट्य होतें. १९२० पर्यंत कंपनीची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नव्हती. १९२० सालीं श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं कंपनीची व्यवस्था स्वतःकडे घेतली. १९२६-२७ पर्यंतच तिची इतकी भरभराट झाली कीं, ती ६ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स फेडून, प्रेफरन्स भागांवरील शिल्लक डिव्हिडंड देऊं शकली. एका वर्षी तिनें ऑर्डिनरी भागास २०% डिव्हिडंड दिलें. पुढें मंदीच्या काळांत कंपनीचें कामहि मंदावलें. साखरेस सरकारनें संरक्षण दिलें, तेव्हां ह्या इंजिनिअरिंग कंपनीचें साखर कंपनींत रूपांतर झालें. कळंब ( आतां वालचंदनगर ) येथें श्री. वालचंद ह्यांनीं १९३३ सालीं रोजी १५० ते २५० टन ऊस गाळण्याची यंत्रसामुग्री बसविली. १९३५-३६ मध्यें उसासाठीं ९७२ एकर जमीन होती, ती १९४२ सालीं ३,५०० एकर झाली व ऊस गाळण्याचे यंत्रसामुग्रीचें सामर्थ्य रोजचें १,००० ते १,१०० टन झालें. १९३४ सालीं फक्त ९ हजार टन ऊस गाळला गेला; १९४१ सालीं १½ लक्ष टन ऊस गाळण्यांत आला. डेअरी, तेलाची गिरणी, वनस्पती तुपाचा कारखाना, इत्यादि उद्योगहि वालचंदनगरमध्यें चालू आहेत. पॉवर अल्कोहोलची यंत्रसामुग्रीहि आतां बसविण्यांत आली आहे. वालचंदनगरच्या कारखान्यांत व मळ्यांत मिळून ८ हजारांवर कामगार आहेत. मार्सलंड प्राइस अँड कंपनीचे उद्देश बदलण्यासंबंधीचें काम ज्या न्यायाधीशापुढें चाललें, त्यास कंपनीचें हें रूपांतर पाहून अचंबा वाटला ! आतां कंपनीचें नामांतर होऊन नवें सार्थ नाम तिला देण्यांत येत आहे. वालचंदनगर येथें गेल्या नाताळांत शेतीच्या अर्थशास्त्रास वाहिलेल्या 'इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स' संस्थेची परिषद भरली होती, हें वाचकांस स्मरत असेलच.

### मुंबईंत घरपुरवठ्याचा ७४ कोटि रु. खर्च येईल

मुंबई शहरांतील दाट व कोंदट वसती काढून टाकून सामान्य स्थितींतल्या कुटुंबांसाठी सोयीचीं व आरोग्यकारक घरें युद्धोत्तर काळांत बांधून द्यावयाचीं झाल्यास ७४ कोटि रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. मुंबई शहरांत एक खोली असलेल्या रहाण्याच्या जागांची संख्या दोन लक्ष, एकुणचाळीस हजार एवढी आहे. पुनर्रचनेंत ह्या राहत्या जागा जाव्या लागतील.


पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मामोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —



# प्रेमामृताचा प्याला !

प्रथम-प्रेम-परिचय-प्रसंगीं-प्रीतीच्या पनघटावर-प्रियकर-प्रणयिनींनीं-प्रेमामृताचा प्याला प्राशन करतांना गायिलेलीं प्रेमगीतें श्रवण करतांना प्रेमीजनांच्या मानसमंदिरांच्या

**फुलबागेंतील मनोवेल पानोपान बहरतें !**

**भाव-मोर थय्‌थय् नाचतो !!**

शनिवार ता. १२ पासून सुरू—

प्रकाश पिक्चर्स, एव्हरग्रीन-रिलीज

## २ रा आठवडा पनघट

भूमिका:-रत्नमाला, उमाकांत, जीवन

**—ग्लोब** फोन ६०१ **पुणें—**

दररोज ६॥ व १० वाजतां

शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.

दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें ग्लोबमध्यें वरच्या दराचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील

---

‘भारतसेवक-समाजा’चे अध्यक्ष, [ पंडित हृदयनाथ कुंझरू ]

‘भारतीय अस्पृश्यता-निवारक संघ’ चे सेक्रेटरी [ श्री. अमृतलाल ठक्कर ]

पण्डिता क्षमाबाई राव, प्रोफेसर मा. दा. आळतेकर

इत्यादि अनेक विद्वानांच्या प्रशंसेस पात्र झालेला व हजारों प्रेक्षकांना आवडलेला

रॉयल रत्न १८ वें

## महात्मा विदुर

पागनीस, दुर्गा खोटे यांची एकत्र भूमिका असलेला भक्त-पट

**आर्यन, पुणें**

दररोज तीन खेळ दुपारीं ३॥, ६॥ व १० वाजतां

दर रविवारीं सकाळीं १० वा. जादा खेळ

आजपासून वाढत्या लोकप्रियतेचा

**९ वा आठवडा**

---

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

चार शहरांत रौप्यमहोत्सव

## रामराज्य-१६ वा आठवडा-

दिग्दर्शक:-विजय भट्ट.

भूमिका:-शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

**मिनर्व्हा, पुणें**

रोज फक्त दोन खेळ ६॥ व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥। वाजतां

[ एव्हरग्रीन-रिलीज ]


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यानी ‘दुर्गाधिवास,’ भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.